'बळजबरीने सत्ता हस्तांतर नको'

अफगाणिस्तानातील परिस्थितीवर भारताची भूमिका

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

'अफगाणिस्तानातील सत्तेचे बळजबरीने हस्तांतर मान्य केले जाणार नाही,' अशी भूमिका पराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी मांडली आहे. अफगाणिस्तानातील सर्व स्थानिक गटांच्या हिताचा सन्मान करून, राजकीय चर्चेच्या मार्गाने संघर्ष दूर करणे महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

ताजिकिस्तानमधील दुशान्बे येथे झालेल्या शांघाय को ऑपरेशन ऑर्गानायझेशनच्या (एससीओ) परराष्ट्रमंत्र्यांच्या बैठकीमध्ये एस. जयशंकर बोलत होते. या बैठकीला रशिया, चीन, पाकिस्तान आणि इतर एससीओ सदस्य देशांचे परराष्ट्रमंत्रीही उपस्थित होते. 'जगाला, प्रदेशाला, तसेच अफगाण लोकांची इच्छा एकच असून, सर्वांना स्वतंत्र, निष्पक्ष, एकत्रित, शांततामय, लोकशाहीवादी आणि समृद्ध अफगाणिस्तान हवा आहे,' असे जयशंकर म्हणाले.

'काही शक्ती वेगळ्या अजेंड्यानुसार काम करणाऱ्या आहेत. अफगाणिस्तानात हिंसाचार आणि बळपूर्वक सत्तेच्या हस्तांतराला जगाचा विरोध आहे. अशा कृतीला मान्यता दिली जाणार नाही,' पराष्ट्रमंत्र्यांनी स्पष्ट केले. अफगाणिस्तानातून अमेरिकी सैन्य माघारी गेल्यानंतर तालिबानने बहुतांश भाग ताब्यात घेतला आहे. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी ही भूमिका मांडली.

'अफगाणिस्तानातील नव्या पिढीच्या वेगळ्या अपेक्षा आहेत. त्यांचे भविष्य भूतकाळशी जोडता येणार नाही,' असेही जयशंकर म्हणाले. दोहा, मॉस्को आणि इस्तंबूल येथील चर्चाप्रमाण स्वीकारार्ह तडजोडी झाल्याचेही ते म्हणाले.

अफगाणिस्तानातील शांततेसाठी दोहा, मॉस्को आणि इस्तंबूल येथे झालेल्या चर्चेमध्ये तालिबान, अफगाण सरकारमधील अधिकारी आणि जागतिक नेत्यांचा समावेश होता. मात्र, या चर्चेतून कोणताही ठोस तोडगा निघालेला नाही. यापुढील चर्चा पुढील महिन्यात दोहा येथे होणार आहे.

पाकिस्तानला खडे बोल

'दहशतवाद आणि मूलतत्त्ववादाचा सामना करणे शांघाय कोऑपरेशन ऑर्गानायझेशनचा (एससीओ) महत्त्वाचे उद्दिष्ट असून, दहशतवादाचा अर्थपुरवठा थांबवायला हवा,' असेही पराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी या बैठकीत सांगितले. बैठकीला पाकिस्तानचे पराष्ट्रमंत्री शाह मेहमूद कुरेशी उपस्थित होते. त्या पार्श्वभूमीवर जयशंकर यांनी दहशतवादाचा मुद्दा मांडून पाकिस्तानला खडे बोल सुनावले. रशियाचे पराष्ट्रमंत्री सर्जे लावरोव्ह, चीनचे पराष्ट्रमंत्री वांग यी हेदेखील या बैठकीला उपस्थित होते. 'वन अर्थ, वन हेल्थ' असा संदेश देताना, करोना साथ संपवण्यासाठी तातडीने जगभरात लसीकरण पूर्ण व्हायला हवे, असेही जयशंकर म्हणाले.

गगनयान मोहिमेत 'विकास इंजिन' निश्चित!

(पान एकवरून) इंजिन ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपक (पीएसएलव्ही), भूस्थिर उपग्रह प्रक्षेपक (जीएसएलव्ही) मार्क २ आणि मार्क ३ अशा तिन्ही रॉकेटमध्ये वापरण्यात येते. जीएसएलव्ही मार्क ३मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या दोन विकास इंजिनांच्या जोडीसाठी ११५ टन द्रवरूप इंधन वापरण्यात येईल. या इंजिनामध्ये इंधन म्हणून 'यूएच २५' (अनसिमेट्रिकल डायमिथाईल हायड्रॅझाईन - यूडीएमएच ७५ टक्के आणि हायड्रॅझाईन हायड्रेट २५ टक्के यांचे मिश्रण), तसेच ऑक्सिडायझर म्हणून डायनायट्रोजन टेट्रोक्साइडचा (एनटओ२) वापर केला जातो.

'इस्रो'च्या सर्व रॉकेटचा मुख्य भाग असणाऱ्या विकास इंजिनाच्या निर्मितीमध्ये डॉ. नंबी नारायण यांची प्रमुख भूमिका होती. हेरगिरीच्या खोट्या केसमध्ये १९९४ मध्ये तत्कालीन केरळ पोलिसांनी नंबी यांना गोवल्यामुळे त्यांची संशोधनाची कारकीर्द संपुष्टात आली. १९८०च्या दशकापर्यंत इस्रोने रॉकेटसाठी धन इंधनाला प्राधान्य दिले होते. नंबी यांनी फ्रेंच व्हायकिंग इंजिनाच्या धर्तीवर द्रवरूप इंधनाचे पहिले स्वदेशी 'विकास' (विक्रम अंबालाल साराभाई यांचे संक्षिप्त रूप) इंजिन तयार करून 'इस्रो'च्या रॉकेटना अतिरिक्त बळ दिले. या इंजिनाचे बळ मिळालेल्या भारतीय मोहिमा चंद्र आणि मंगळाकडे झेपावल्या. आज हेच इंजिन भारतीय मानवी अवकाश मोहिमेतही महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

१५ हजार पदांची भरती लवकरच

(पान एकवरून) तपासून पद भरती गतीने राबवण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू आहे, असे ते म्हणाले. उमेदवारांच्या मुलाखतीच्या टप्प्यावर प्रतीक्षेत असलेली भरती प्रक्रिया पार पाडण्याच्या दृष्टीने एमपीएससी सदस्यांची चार रिक्त पदे भरणे गरजेचे आहे. सदस्यांची ही पदे भरण्यासाठी जुलै अखेरपर्यंत सर्व प्रक्रिया पार पाडण्याबाबतही बैठकीत निर्देश देण्यात आले. याशिवाय, केरळ लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्य संख्येत वाढ करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. त्यामुळे भविष्यातील मुलाखती गतीने पार पाडता येतील.

संघ लोकसेवा आयोगाकडून (यूपीएससी) दरवर्षी पुढील संपूर्ण वर्षाचे परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले जाते. त्याच धर्तीवर एमपीएससीच्या परीक्षांचेही वेळापत्रक जाहीर करण्याबाबतचे निर्देशही देण्यात आले आहेत, अशी माहिती भरणे यांनी यावेळी दिली.

केंद्रीय कर्मचाऱ्यांना २८ टक्के महागाई भत्ता

(पान एकवरून) २०२० साठी तीन टक्के, जुलै-डिसेंबर २०२० साठी चार टक्के आणि जानेवारी ते जून २०२१ साठी चार टक्के अशी महागाई भत्त्यात एकूण ११ टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. या दरवाढीचा ४८ लाख ३४ हजार केंद्रीय कर्मचारी तसेच ६५ लाख २६ हजार निवृत्त केंद्रीय कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार आहे. महागाई भत्त्यातील या वाढीमुळे सरकारच्या खजिन्यावर दरवर्षी ३४ हजार ४०१ कोटींचा भार पडणार असल्याचे ठाकूर यांनी सांगितले.

सार्वजनिक उपक्रमांना सातवा आयोग

उपक्रमांनी सन २०१७-१८ पर्यंतचे लेखे विधानमंडळाला सादर केलेले असावेत, अशी अट धालण्यात आली आहे.

या निर्णयाचा लाभ पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र पेट्रोकेमिकल महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, महाराष्ट्र राज्य वियाणे महामंडळ, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, हाफकिन बायोफार्मास्युटिकल महामंडळ, महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, महिला आर्थिक विकास महामंडळ अशी ३१ महामंडळे आहेत.

'सरकार सहाय्यक, संघटन श्रेष्ठ!'

(पान एकवरून) जवळून घेतला आहे. माणसांमध्ये परिवर्तन नक्कीच होते. पण त्यासाठी संघटनांना धैर्य आणि संयम बाळगावा लागतो.'

'शिक्षण आणि आरोग्यसारख्या सुविधा प्रत्येक नागरिकाला मिळायलाच हव्यात. वर्तमानात आरोग्यसुविधा सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर चालली आहे. सामान्यांच्या आवाक्यातील दरांमध्ये दर्जेदार सेवा देण्याची क्षमता आयुर्वेदामध्ये आहे. त्यातूनच्ची आयुर्वेदाच्या प्रचाराचे धोरण असायला हवे. आजारपणाच्या पलीकडे जाऊन माणसाचे आयुष्यच निरामय करण्याचा उत्तुंग दृष्टिकोन जगाच्या पाठीवर केवळ आयुर्वेद आजवर मांडू शकले', असे भागवत म्हणाले.

'आयुर्वेदाने नेतृत्त्व करावे'

आजमितीला विविध पॅथींमध्ये श्रेष्ठत्वाची स्पर्धा आहे. खरेतर सर्व पॅथींचे आपसात ज्ञानाचे आदान-प्रदान होणे गरजेचे आहे. पॅथींचा आपसात समन्वय साधण्यासाठी आयुर्वेदाने जागतिक स्तरावर नेतृत्व करण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा, अशी अपेक्षा भागवत यांनी व्यक्त केली. व्यावहारिक विश्वात काही कार्ल्पनिक आजार आणि त्यावर कार्ल्पनिक औषधांचीही हेतूपुरस्सर पेरणी करून अपेक्षित उद्दिष्ट आंतरराष्ट्रीय स्तरावर गाठले जाते, असे सांगून सरसंघचालकांनी अप्रत्यक्षपणे सध्याच्या करोना संसर्गाकडे अंगुलीनिर्देश केल्याचे बोलले जात आहे.

मुंबईला दिलासा!

(पान एकवरून) नोंदवण्यात आला आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, पुणे या जिल्ह्यांमधील परिस्थिती अजूनही चिंताजनक आहे. पुणे येथे १५ ते २१ जुलैदरम्यान साप्ताहिक पॉझिटीव्हीटी दर ७.५३ टक्के होता, तो ६ ते १२ जुलै या कालावधीमध्ये ७.७४ टक्के झाला. सातारा येथे याच कालावधीमध्ये हे प्रमाण अनुक्रमे ७.७७ टक्के आणि ८.२३ टक्के इतके नोंदवले गेले.

मुंबईमध्ये पॉझिटिव्हटी दर १.७८ टक्के असून ताण्यात तो मुंबईपेक्षा अधिक, म्हणजे ३.०५ टक्के असल्याचे दिसते. नागपूर, गोंदिया आणि भंडारा येथे रुग्णवाढीचा दर हा शून्य असल्याचे सरकारने दिलेल्या माहितीवरून दिसून येते. नागपूर येथे दुसऱ्या लाटेमध्ये रुग्णसंख्येची उसळी अधिक होती.

नोटा चोरीचा संशय कर्मचाऱ्यांवरच

म. टा. खास प्रतिनिधी, नाशिक

नाशिकरोड येथील करन्सी नोट प्रेसमधील नोटा चोरीच्या संशयाची सुई तेथील कर्मचाऱ्यांभोवती फिरू लागली आहे. नोटप्रेसमध्ये बाहेरील कोणाही व्यक्तीस जाण्याची परवानगीच नसल्याने कर्मचाऱ्यांपैकीच कुणीतरी या गुन्ह्यात सहभागी असल्याची फिर्यादि उपनगर पोलिस स्टेशनमध्ये देण्यात आली आहे.

नोट प्रेसच्या सुरक्षा व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी धक्कादायक घटना २९ जून रोजी घडली आहे. ५०० रुपये मूल्याच्या १६४००१ ते १६५००० या अनुक्रमांकादरम्यानच्या एकूण एक हजार नोटा चोरीस गेल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी मंगळवारी (दि. १३) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रेसनोटमध्ये कार्यरत कामगार, स्टाफ किंवा सुरक्षारक्षक यांपैकी कोणीतरी या नोटा चोरी करून नेल्याचे शर्मा यांनी फिर्यादीत म्हटले आहे.

नोट प्रेसमध्ये बाहेरील व्यक्तीस जाण्यास परवानगीच नसल्याने पॉकेज बे सेक्शन व सीएनपी नोट प्रेसमधील कामगार, स्टाफ किंवा सुरक्षारक्षक यांपैकी कोणीतरी या नोटा चोरी करून नेल्याचा दावा फिर्यादीत करण्यात आला आहे.

गॉडफ्रे फिलिप्स इंडिया लिमिटेड
सीआयएनः L16004MH1936PLC008587
नोंदणीकृत कार्यालयः 'मॅक्रोपोलो बिल्डींग', तळमजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, लालबाग, मुंबई – ४०० ०३३
दूरध्वनीः ०२२-६१९५ २३०० फॅक्स : ०२२-६१९५ २३१९
व्यावसायिक कार्यालयः 'ओमेक्स स्क्वेअर', प्लॉट नं. १४, जसोला डिस्ट्रिक्ट सेंटर, जसोला, नवी दिल्ली – ११००२५ फोनः ०११-२६८३२१५५, ६१११९३००
ईमेलः isc-gpi@modi-ent.com वेबसाईटः www.godfreyphillips.com

सूचना

याद्वारे सूचित करण्यात येत आहे की एजीएम आमंत्रित करणाऱ्या सूचनेमध्ये नमूद केलेले कामकाज पार पाडण्यासाठी गॉडफ्रे फिलिप्स इंडिया लिमिटेडच्या सभासदांची ८२वी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'') गुरुवार, ०५ ऑगस्ट, २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हिसी)/इतर दृकश्राव्य माध्यमे (ओएव्हिएम) यांच्याद्वारे घेण्यात येईल.

सध्याची कोविड-१९ महामारी विचारात घेता कंपनी बाबींचे मंत्रालय (एमसीए) यांनी आपली सर्वसुलभ दिनांकीत ८ एप्रिल २०२०, १३ एप्रिल २०२० आणि १३ जानेवारी २०२१ (एकत्रितरीत्या 'एससीए सर्वसुलभ' म्हणून उल्लेख असणारी) यांच्याबरोबर वाचण्यात येणारे सर्वसुलभ दिनांकीत १५ मे २०२० आणि सेबी सर्वसुलभ दिनांकीत १२ मे २०२० व १५ जानेवारी २०२१ यांच्याद्वारे सार्वजनिक ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय, व्हिसी/ओएव्हिएम द्वारे एजीएम घेण्यास परवानगी दिली आहे. कंपनी कायदा, २०१३ (दि ॲक्ट), सिक्युरीटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टींग ऑब्लीगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्टस्), रेग्युलेशन्स २०१५ (दि लिस्टींग रेग्युलेशन्स) आणि एससीए सर्वसुलभ यांच्या आवश्यकतांनुसार कंपनीची एजीएम व्हिसी/ओएव्हिएम द्वारे घेण्यात येत आहे.

ज्या सभासदांचे इ-मेल ॲड्रेसेस कंपनीचे रजिस्ट्रार ॲण्ड शेअर ट्रान्सफर एजंट/डिपॉझिटरी पार्टिसिपन्टस् यांच्याकडे नोंदविलेले आहेत त्यांच्याकडे एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक स्वरूपात १४ जुलै २०२१ रोजी पाठवून देण्यात आले आहेत.

सभासदांनी नोंद घ्यावी की वार्षिक अहवाल आणि इतर अनेक बाबींबरोबरच इ-मतदानाच्या कार्यपध्दतीची प्रक्रिया आणि पध्दती निर्देशित करणारी एजीएमची सूचना या कंपनीच्या वेबसाइट www.godfreyphillips.com वर आणि स्टॉक एक्स्चेंजेस म्हणजेच बीएसइ लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांच्या वेबसाईट्स अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com यांच्यावर उपलब्ध आहेत आणि याशिवाय त्या रजिस्ट्रार ॲण्ड शेअर ट्रान्सफर एजंट ('आरटीए') लिंक इनटाईम इंडिया प्रा. लिमिटेड (एलआयआयपीएल) यांच्या https://instavote.linkintime.co.in/ येथील वेबसाईट वरून सुध्दा डाऊनलोड करून घेता येतील.

कंपनीज् (मॅनेजमेन्ट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन) ॲमेन्डमेन्ट रूल्स २०१५ बरोबर वाचण्यात येणारे कंपनी कायदा २०१३ चे कलम १०८ आणि सेबी (एलओडीआर) रेग्युलेशन्स, २०१५ चे रेग्युलेशन ४४ यांच्या मधील तरतुदींच्या अनुसार आपल्या सभासदांना त्यांचा मतदानाचा अधिकार इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे बजावता यावा यासाठी सुविधा पुरविताना कंपनीला आनंद होत आहे आणि हे कामकाज लिंक इनटाईम इंडिया प्रा. लिमिटेड (एलआयआयपीएल) यांच्याकडून पुरविण्यात येणाऱ्या रिमोट इ-मतदान सुविधेद्वारे पार पाडता येऊ शकेल. रिमोट इ-मतदानाचा कालावधी **सोमवार ०२ ऑगस्ट २०२१ रोजी सकाळी ९.०० वा.** पासून सुरू होत आणि **बुधवार ०४ ऑगस्ट २०२१ रोजी संध्या. ५.०० वा** समाप्त होत आहे. रिमोट इ-मतदान त्यानंतर अकार्यरत करण्यात येईल आणि त्या वेळेनंतर इ-मतदानास परवानगी दिली जाणार नाही.

ज्या सभासदांनी एजीएमपूर्वी रिमोट इ-मतदानाद्वारे आपले मतदान केले असेल, असे सभासद व्हिसीद्वारे एजीएमला हजर राहू शकतात, परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार नसेल. ज्या सभासदांनी रिमोट इ-मतदानाद्वारे आपले मतदान केले नसेल आणि व्हिसीद्वारे एजीएमला उपस्थित असतील, ते सभासद एजीएमच्या वेळेस इ-मतदानाद्वारे मतदान करण्यास पात्र असतील.

सभासदांचे मताधिकार हे २१ जुलै २०२१ ह्या निर्णायक तारखेस कंपनीच्या भरणा झालेल्या समभाग भांडवलातील त्यांच्या समभागांच्या प्रमाणात असतील. कथित निर्णायक तारखेस छापील किंवा डिमटेरीअलाइज्ड स्वरूपात भागधारण असणारे सभासद रिमोट इ-मतदान किंवा एजीएमच्या ठिकाणी मतदान करण्याच्या सुविधेचा लाभ घेण्यास पात्र आहेत. जर एखाद्या व्यक्तिने, एजीएमची सूचना वितरीत झाल्यानंतर कंपनीचे समभाग प्राप्त केले असतील आणि ती निर्णायक तारखेस म्हणजेच २९ जुलै २०२१ रोजी सदर समभाग धारण करीत असेल तर ती व्यक्ती enotices@linkintime.co.in वर विनंती पाठवून लॉग इन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. तथापि, जर त्याची/तिची यापूर्वीच रिमोट इ-मतदानासाठी एलआयआयपीएल/डिपॉझिटरी यांच्याकडे नोंदणी झाली असेल तर तो/ती आपले मत देण्यासाठी त्याच्या/तिच्या वर्तमान युझर आयडी आणि पासवर्ड यांचा वापर करू शकते.

छापील स्वरूपात भागधारणा असणाऱ्या ज्या सभासदांनी आपले इ-मेल ॲड्रेस नोंदविलेले नसतील त्यांनी त्यांची माहिती https://linkintime.co.in/emailreg/email_register.html वर सादर करून लिंक इनटाईम, आरटीए यांना कळवून त्याची नोंदणी करून घ्यावी. त्याचप्रमाणे इलेक्ट्रॉनिक स्वरूपात भागधारणा असणाऱ्या सभासदांनी त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपन्टस्ना (डिपी) तसे कळवावे.

कोणत्याही प्रकारच्या शंका असल्यास सभासद https://instavote.linkintime.co.in येथे हेल्प सेक्शन खाली उपलब्ध असणारे वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज) आणि इनटाचोट मॅन्युअल पाहू शकतात किंवा enotices@linkintime.co वर इ-मेल पाठवू शकतात अथवा ०२२ -४९१८ ६००० वर लिंक इनटाईम बरोबर संपर्क साधू शकतात किंवा लिंक इनटाइम इंडिया प्रा. लि. यांच्याशी सी-१०१, २४७ पार्क, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई – ४०० ०८३ दूरध्वनी क्र. ०२२-४९१८६००० येथे नियुक्त इ मेल आयडीः rajiv.ranjan@linkintime.co.in वरील श्री. राजीव रंजन (असिस्टंट व्हाइस प्रेसिडेन्ट) यांच्याशी संपर्क साधू शकतात.

तसेच याद्वारे कंपनीज् (मॅनेजमेन्ट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन) रूल्स २०१४ च्या रूल १० बरोबर वाचण्यात येणारे कंपनी कायदा, २०१३ चे कलम ९१ आणि सेबी (एलओडिआर) रेग्युलेशन २०१५ चा रेग्युलेशन ४२ यांच्यानुसार सूचित करण्यात येत आहे की, कंपनीची रजिस्टर ऑफ मेंबर्स आणि शेअर ट्रान्सफर बुक्स ही एजीएमसाठी शुक्रवार, ३० जुलै २०२१ पासून गुरूवार, ०५ ऑगस्ट २०२१ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत बंद राहतील.

गॉडफ्रे फिलिप्स इंडिया लिमिटेड करिता
संजय गुप्ता
कंपनी सेक्रेटरी
दिनांकः १५ जुलै २०२१ (एम. नं. ७५४५)

National Dairy Development Board
PB No. 40, Anand 388001, Gujarat, India
Tel: 02692-260148/260149/260160 Fax: 02692-260159
Website: www.nddb.coop, Email: purchase@nddb.coop
INVITATION FOR BIDS (IFB)/ LOCAL COMPETITIVE BIDDING (LCB)

Bids are invited from eligible bidders for carrying out the following job:

Sr.No.	Description/Bid Reference	Duration	Event Start/ Close Date	Bid Submission/ Opening date & Time
1	Rate Agreement for establishment of pregnancies using bovine IVF embryos under Accelerated Breed Improvement Programme in animals of farmers from identified milk unions / Producer Companies under Rashtriya Gokul Mission (RGM) scheme of Govt. of India.(Estimated pregnancies.: 66667) NDDB:PUR:RGM:LCB:33/2021 (ET/33)	12 months	15/07/2021/ 12/08/2021	12/08/2021 15:00 hrs. / 12/08/2021 15:30 hrs.

For further details pertaining to IFB and for downloading the bid document, please visit these websites: www.nddb.coop and https://www.mstecommerce.com/eprochome/nddb/ For any clarification please contact DGM (Purchase), NDDB, Anand-388001, Gujarat,India.
NB: Any corrigendum/modification etc. will be posted only on these websites. Issued by: National Dairy Development Board, Anand, Gujarat

भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ

सूचना

खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या संस्थांविरूद्ध अभियोजन आदेश पारित केले गेले आहेत. तथापि, सेबी (चौकशी ठेवण्याची व दंड आकारण्याची प्रक्रिया) रूल्स, १९९५ च्या नियम ७ नुसार नमूद केलेल्या संस्थांच्या ज्ञात पत्त्यावर उक्त आदेश वितरीत होऊ शकले नाहीत. त्या दृष्टीने, खालील तक्त्यात नमूद केलेल्या संस्थांना कळविण्यात येत आहे की, उक्त अभियोजन आदेश त्यांच्या माहिती आणि आवश्यक पालनासाठी सेबीची वेबसाइट (www.sebi.gov.in वर अंमलबजावणी –>वितरीत केले जाऊ शकत नाहीत असे आदेश मथळ्या अंतर्गत) वर उपलब्ध आहेत.

अ. क्र.	अभियोजन आदेशाचे तपशील	प्रकरणाचे नाव	संस्थेचे नाव आणि शेवटचा ज्ञात पत्ता
१	अभियोजन आदेश क्र. आदेश/केएसएफएसएस/२०२१-२२/१२२३५-१२२४७ दिनांकीत १४ जून, २०२१	आधार व्हेंचर्स इंडिया लि.	संतोष वर्सेत भेलेकर (पॅन: एएफबीपीबी२८८७सी) रूम नं. २०२, साई धाम अपा. मनवेलपाडा नाका, विरार पूर्व, पालघर.
२			सौरभ कुमार रसिकलाल गांधी (पॅन: एएमबीपीजी६०४२एम) ३०४/ए, आनंद नगर अपार्टमेंट, ६० फुटी रोड, भाईंदर (पश्चिम), ठाणे.
३			व्ही अण्ड आर यार्न्स प्रायव्हेट लिमिटेड (पॅन: एएडीसीव्ही४४७३सी) १/३०१, शिश महल, व्यवेकटवर नगर, कॅबिन रोड, भाईंदर (पूर्व), ठाणे.
४			किनिता रिअल इस्टेट प्रायव्हेट लिमिटेड (पॅन: एएडीसीके७७३९जी) शॉप केएल-०४, गोकुल व्हिलेज (दोन) हो. सोसायटी लि. बालाजी हॉटेल शांती पार्क, मीरा रोड (पूर्व), ठाणे महा. ४०१७०७ मध्ये.
५			गजपाल बिल्डइन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड (पॅन: एएडीसीजी५६९९आर) ३१२/३ सारडा चेंबर नं. १, ३१ के एन रोड, मुंबई ४००००९.
६			व्हॅटब्यू प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड (पॅन: एएडीसीजी०७९९जी) २०१, पल्लवी सीयवएस लि., टाटा कॉलनी, मुलुंड पूर्व, मुंबई ४०००८१.
७			मोर्नकम प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड (पॅन: एएजीसीएम५७६५एम) ए २, महावीर दर्शन सीएचएस लि., शांती पार्क, महावीर दर्शन इमारत x ३१ / ३२, मीरा रोड (पूर्व), ठाणे ४०१७०७.
८			जासिमन सुशिलकुमार बजोरीया (पॅन: एकेबीपीबी३३४२डी) ८१९६, एम के अमीन मार्ग, पटेल इमारत, ३रा मजला, आर. क्र. ३६, फोर्ट, मुंबई–४०० ००१.
९			इंदिवर ट्रेडर्स प्रायव्हेट लिमिटेड (पॅन: एएसीसीआय१५८५के) रूम नं. १३, दौलत नगर, रोड नं.-७, बोरिवली पूर्व, जैन ठेरासर जवळ, मुंबई ४०००६६
१०			अबिजाइ रिअल इस्टेट प्रा. लि. (पॅन: एएआयसीए०६१७एल) ३५, अनंत निवास, २६२/१७०, नरसी नाथा स्ट्रीट, भात बाजार, मुंबई-९.
११			जिग्नेश चंद्रकांत शाह (पॅन: बीसीडब्ल्यूपीएस६५९३आर) ८१९६, एम के अमीन मार्ग, पटेल इमारत, ३रा मजला, आर. क्र. ३६, फोर्ट, मुंबई–४०० ००१.
१२	अभियोजन आदेश क्र. आदेश/केएसएफएसएस/२०२१-२२/१२३०९-१२३१५ दिनांकीत २२ जून, २०२१	हिमाचल फायबर्स लि.	चांदनी नितीश बदलानी (पॅन: बीएझेडपीबी४७७८ए) बी/२०१, पद्म कुंजर सोसायटी, एमजी रोड, हायलॅंड कॉम्प्लेक्स जवळ, चारकोप गाव, कांदिवली पश्चिम, मुंबई-४०००६७.
१३	अभियोजन आदेश क्र. आदेश/केएसएफएसएस/२०२१-२२/१२६८६-१२७०६ दिनांकीत १७ मे, २०२१	ग्रोमो ट्रेड ॲंड कन्सल्टन्सी लि.	गिरीश राजकुमार मोएल (पॅन: बीडीएलपीडी२६३४के) ए-१०२, भालचंद्र कॉम्प्लेक्स, सुदर्शन क्रॉस लेन, नवघर रोड, भाईंदर (पू), ठाणे–४०१७०५.
१४			वकील राजभर (पॅन: एओएसपीआर९१००ई) जय अंबे नगर १, रूम नं. -२३४, शिल्पा जनरल स्टोअर समोर, भाईंदर पश्चिम, मुंबई–४०१९०१.

दिनांकः ०१.०७.२०२१
ठिकाणः मुंबई
डीएकपी १५२०४/११/०१३०/२१२२

भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ
Securities and Exchange Baord of India

जाहिर सूचना

या सूचनेन्वये, खालील नोटीसींना असे कळविण्यात येते की, ११ जुलै, २०११ रोजी टोगो रिटेल मार्केटिंग लि. च्या प्रकरणात पूर्व वेळ सदस्य, भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ यांनी अंतिम आदेश पारीत केला होता. खालील घटकांना पाठविलेला उक्त आदेश वितरीत न होता परत करण्यात आला आहे-

श्री. गिरीराज वशिष्ठ s/o श्री. नारायण वशिष्ठ
माजी संचालक – टोगो रिटेल मार्केटिंग लिमिटेड
१०१, विवेक सीएचएस, शितल नगर, कांदिवली – पूर्व, मुंबई – ४००१०१
महाराष्ट्र

उक्त आदेश सेबीची वेबसाइट– www.sebi.gov.in वर "अंमलबजावणी – अध्यक्ष/सदस्यांचे आदेश" या मथळ्याखाली उपलब्ध आहे. उक्त आदेशाची प्रत भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ, सेबी भवन-II, प्लॉट क्र. सी–७, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०० ०५१ या पत्त्यावरील आमच्या कार्यालयातून प्राप्त करता येईल.

ठिकाणः मुंबई
उपमहाव्यवस्थापक
डीएकपी १५२०४/११/०१३३/२१२२

भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ

सूचना

खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या संस्थांविरूद्ध अभियोजन आदेश पारित केले गेले आहेत. तथापि, सेबी (चौकशी ठेवण्याची व दंड आकारण्याची प्रक्रिया) रूल्स, १९९५ च्या नियम ७ नुसार नमूद केलेल्या संस्थांच्या ज्ञात पत्त्यावर उक्त आदेश वितरीत होऊ शकले नाहीत. त्या दृष्टीने, खालील तक्त्यात नमूद केलेल्या संस्थांना कळविण्यात येत आहे की, उक्त अभियोजन आदेश त्यांच्या माहिती आणि आवश्यक पालनासाठी सेबीची वेबसाइट (www.sebi.gov.in वर अंमलबजावणी –>वितरीत केले जाऊ शकत नाहीत असे आदेश मथळ्या अंतर्गत) वर उपलब्ध आहेत.

अ. क्र.	अभियोजन आदेशाचे तपशील	प्रकरणाचे नाव	संस्थेचे नाव आणि शेवटचा ज्ञात पत्ता
१	अभियोजन आदेश क्र. आदेश/केएसएफएसएस/२०२१-२२/१२२३५-१२२४७ दिनांकीत १४ जून, २०२१	आधार व्हेंचर्स इंडिया लि.	संतोष वर्सेत भेलेकर (पॅन: एएफबीपीबी२८८७सी) रूम नं. २०२, साई धाम अपा. मनवेलपाडा नाका, विरार पूर्व, पालघर.

दिनांकः ०१.०७.२०२१
ठिकाणः मुंबई
डीएकपी १५२०४/११/०१३१/२१२२